# 1980 च्या दशकातील दशकातील निवडक कवयित्रींच्या स्त्रीवादी कवितांचा अभ्यास

**श्रीमती. तृप्ती राघवेंद्र सबनीस.**
लेखाधिकारी/वित्त विभाग.
गुरुनानक खालसा कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स माटुंगा (पूर्व)मुंबई -400019
ई मेल=truptisabnis२२०१@gmail.com

---

**प्रस्तावना** :

मराठी कवितेला सुमारे 800 वर्षांची परंपरा आहे. मराठी वांग्मय क्षेत्रामध्ये काव्य या प्रकाराने पूर्वीपासूनच आपला अलौकिक ठसा उमटवला आहे.मराठी कवितेची परंपरा पाहता लोकगीते, प्राचीन मराठी कविता आधुनिक मराठी कविता आणि नवकविता असे टप्पे आढळून येतात. मराठी कवितेतील स्त्रियांच्या कवितेची पार्श्वभूमी पाहता मराठी साहित्य संस्कृतीत स्त्री साहित्याची सुरुवात महानुभव संप्रदायातील आद्य कवयित्री महदंबा उर्फ महादाईसा यांचे पहिले काव्य मानावे लागते. महदंबा या कवयित्रीचे 'ढवळे पूर्वार्ध व उत्तरार्ध' हा काव्यग्रंथ आहे. वारकरी सांप्रदायातील मुक्ताई, जनाबाई कान्होपात्रा इत्यादी संत कवयित्रीनी भक्ति महात्म्याबरोबर ओवी अभंगातून स्त्री दुःख प्रगट करून स्त्री साहित्याची निर्मिती केली. पंडिती आणि शाहिरी सांप्रदायात स्त्रियांचा सहभाग दिसून येत नाही.

सन 1920 पर्यंत ची कविता ही स्फूट स्वरूपाची होती. या काळात स्त्री शिक्षणापासून वंचित असल्यामुळे तिचे ज्ञानाचे क्षेत्र मर्यादित होते. तत्कालीन नियतकालिकांमधून स्त्रियांची काव्यसंपदा प्रसिद्ध झालेली दिसून येते. सन 1882 ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री पुरुष तुलना' हे पुस्तक लिहून पुरुषसत्ताक जीवन पद्धतीचे बुरखे फाडले.

1920 ते 1945 हा काव्य क्षेत्रातील बहुआयामी कालखंड आहे. या कालखंडातील रविकिरण मंडळामध्ये सौ. मनोरमाबाई रानडे व रविकिरण मंडळाबाहेरील बहिणाबाई चौधरी हया कवयित्री आहेत. बहिणाबाईनी(१८८० ते १९५१), त्यांना आलेले जीवनविषयक अनुभव व विचार आपल्या कवितेत प्रतिबिंबित केले. बहिणाबाईंची कविता स्त्री-पुरुषांना आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. त्यांची कविता परखड, स्पष्टवक्ति,तत्त्ववेत्ती आणि रोखठोक होती. मनोरमा श्रीधर रानडे (१८९६ ते १९२६) ह्या रविकिरण मंडळाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक प्रसिद्ध कवयित्री होत्या. ज्यांनी 'गोपिकातनया' या टोपण नावाने काव्यलेखन केले. त्यांच्या कवितांमध्ये दैनंदिन जीवनाचे अनुभव आणि आत्मलेखनपरता प्रमुख होते. "काळाच्यादाढेतून" हे त्यांच्या उल्लेखनीय काव्यांपैकी एक आहे. त्यांनी त्यांच्या काव्यातून स्त्री अधिकार आणि स्त्रीच्या सामाजिक स्थितीवर प्रकाश टाकला.

1945 हा मराठी नवकाव्याचा प्रारंभ मानला जातो. 1945 ते 1960 हा नवकवितेचा पहिला टप्पा. यावेळी दुसरे महायुद्ध झाले होते या महायुद्धामुळे जनजीवन विस्कळीत झालेले. सर्वत्र उलथापालथ झाली होती त्याचे सर्व साद- पडसाद जनमानसांवर पडले होते. सगळीकडे नैराश्य, उध्वस्थता, मनाचे व्याकुळलेपण पसरले होते त्यातूनच 'नवकवितेचा' जन्म झाला. नवकवितेचे खरे जनक बा.सी. मर्ढेकर(1909 ते 1956) आणि शरदचंद्र मुक्तिबोध(1921 ते 1984) हे आहेत.

या कालखंडात साहित्याचे नवे प्रवाह येऊ लागले होते. या काळातील स्त्रीवादी कविता म्हणजे केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नव्हती तर ती सामाजिक परिवर्तनाची एक साधन बनली. अनेक कवयित्रीने स्त्रीवादी विचार त्यांच्या काव्यातून प्रकट केले स्त्रीच्या अनुभवांना तिच्या शोषणाला आणि सामाजिक असमानतेला कवितेत स्थान देण्यात आले. त्यांनी पुरुष व्यवस्थेतील दुटप्पीपणावर ताशेरे ओढले. प्रेम, वेदना, भावना, एकाकीपणा, आर्थिक विषमता, दारिद्र्य इत्यादी भावना त्यांच्या कवितेतून प्रकट झाल्या. आर्थिक विषमता, दारिद्र्य, निसर्गाची विविध रूपे, ग्रामीण जीवनातील अनुभव, स्त्री- संघर्ष आणि सामाजिक वास्तवाचे चित्रण अनेक कवयित्रींच्या काव्यात महत्त्वाचे ठरले. अनेक कवयित्रीनीं आत्मपरीक्षण करून त्यांच्या व्यक्तिगत अनुभवांवर आधारित कविता लिहिल्या अशा अनेक विषयांनी स्त्रीवादी काव्यात एक नवा आयाम आणला. उदा. पद्मा गोळे, इंदिरा संत, संजीवनी मराठे, शांता शेळके इ. या कवयित्रीनीं आपल्या कवितेने मराठी काव्यप्रवाहात आपले वेगळे स्थान निर्माण केले.

1960 ते 1980 पर्यंतची कविता म्हणजे नवकवितेचा दुसरा टप्पा मानला जातो या कालखंडात सामाजिक, राजकीय आर्थिक परिस्थिती पूर्ण बदलली होती. सर्व प्रकारचे संदर्भ बदलू लागले होते. सगळीकडे शिक्षणाचा प्रसार झाला होता. जगण्याचे बदलते संदर्भ आणि बदलते समाजवास्तव यामुळे या काळात प्रत्येकाच्या प्रवृत्तीनुसार कविता निर्माण झाली. या नवकवितेच्या कालखंडामध्ये काही नामवंत कवयित्री होऊन गेल्या त्यानीं स्त्रीवादी आणि स्त्रीकेंद्री भूमिकेतुन जोमाने काव्य लेखन केले. उदा. प्रभा गणोरकर, रजनी परूळेकर,अनुराधा पोतदार, अश्विनी घोंगडे, ज्योती लांजेवार , अरूणा ढेरे, मल्लिका अमर शेख, निरजा, प्रज्ञा लोखंडे इ.

**विवेचन** :

1975 च्या स्त्रीमुक्ती चळवळी नंतर स्त्रीवादी साहित्याचा खरा प्रसार झाला. स्त्रियांना स्व:त्वाची जाणीव झाली आणि स्वतःवरील होणाऱ्या अन्याय व शोषणाविरुद्ध स्त्री बंड करून उठली. डॉ.अश्विनी घोंगडे म्हणतात, "जाणीव जागृती हा स्त्री चळवळीचा मुख्य आधार असल्याने अशा खास अनुभवांना अविष्कृत करणारे साहित्य हे स्त्रीवादी साहित्य होय."1 ,

1980 च्या दशकातील कवितेचा महत्त्वाचा भाग म्हणजे स्त्रियांची स्त्रीवादी, स्त्रीकेंद्री नवीन पिढी उदयास आली. स्त्रीवादी साहित्य निर्मितीला प्रारंभ जरी स्वातंत्र्योत्तर काळात झाला तरी खऱ्या अर्थाने 1975 च्या स्त्रीमुक्ती चळवळी नंतरच ही संकल्पना रूढ झाली. या चळवळीमुळे स्त्रीला स्वत्वाची ओळख पटली स्त्री सजग झाली. स्त्री स्वतःवरील अन्यायाविरुद्ध बंड करून उठली आणि स्त्रीवादी साहित्याचे वेगळेपण निर्माण झाले. पुरुषांच्या विरोधात स्त्रियांचा आवाज बुलंद झाला स्त्री केंद्री संवेदना आणि जाणिवा या मूल्यांना प्राधान्य प्राप्त झाले. स्त्रियांनी लिहिलेली कविता म्हणजेच 'स्त्रियांची कविता' स्त्रीला जीवन जगताना जे-जे सोसावे लागते, ती अनुभवते, तिच्या मनाची होणारी कुचंबणा, तिला मिळणारा दुय्यम दर्जा, अपमान इत्यादी सर्व वेदनांचा हुंकार म्हणजेच स्त्रियांची 'स्त्री केंद्री' कविता असे म्हणता येईल.

1980 च्या दशकात , प्रभा गणोरकर(1945), अश्विनी घोंगडे (1947), ज्योती लांजेवार (1950), मल्लिका अमर शेख(1957), निरजा(1960) प्रज्ञा लोखंडे(1966) या आघाडीच्या कवयित्री म्हणून ओळखल्या जातात त्यांच्या स्त्रीवादी काव्याचा परामर्श येथे घेण्यात आला आहे. या कवयित्रीनी त्यांच्या काव्यात स्त्री जीवनाचे सर्व अनुभव आपापल्या परीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक कवियत्रीचा जीवनानुभव, शैली, रचना वेगवेगळी आहे.

1980 च्या दशकातील कवयित्रींच्या साहित्याने पारंपारिक कौटुंबिक मूल्ये "चूल आणि मूल" कालबाह्य

ठरवली. स्त्रीचा स्वतःचा हक्क, स्त्री समस्या, स्त्रीच्या शारीरिक अनुभवांचे अविष्कारण, स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार, स्त्रियांची मानसिकता स्त्री-पुरुष संबंध, स्त्रियांच्या लैंगिक प्रेरणा, स्त्रीचे स्वानुभव इत्यादी स्त्री संबंधिच्या अनेकविध संवेदना आणि जाणीव स्त्रीवादी साहित्यातून अभिव्यक्त केल्या.

**1. प्रभा गणोरकर** :

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीला आपल्या स्व-त्वाची, अस्मितेची जाणीव होऊन स्त्री सजग झाली. प्रभा गणोरकर यांचे व्यतित (1974) आणि विवर्त (1985) असे दोन काव्यसंग्रह असून त्यांच्या कविता स्त्रीच्या अस्मितेचा स्वातंत्र्याचा, समानतेचा आणि स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या आहेत. त्यांच्या कवितांमधून स्त्री वादी चळवळीचा पाठपुरावा दिसून येतो. त्यांनी त्यांच्या कवितांमधुन स्त्रीमुक्तीचा संदेश दिलेला असून स्त्रीच्या शोषणाविरोधात आवाज उठविलेला आवाज दिसून येतो. गणोरकर यांनी त्यांच्या कवितांमध्ये पारंपारिक मूल्याचा विचार करून पितृसत्ताक व्यवस्थेतील स्त्रीच्या अवस्थेवर प्रकाश टाकला आहे. 'विवर्त' या त्यांच्या काव्यसंग्रहातील कवितांमधून त्यांनी स्त्रीच्या जीवनातील विविध अनुभवांचे दर्शन घडविले आहे. स्त्रियांच्या दाहक जीवनानुभवांना अभिव्यक्त करताना त्यांच्या 'विवर्त' काव्यसंग्रहातील कवितेतून त्या म्हणतात,

"त्या प्रखर गर्दीतून हिंडताना मी वेढुन घेतल्या,
स्वतःभोवती भडभडून येणाऱ्या मायेच्या आठवणी"
(प्रखर गर्दीतून हिंडताना पृ.क्र.65)

स्त्रियांच्या चौकट बंद जीवनपटात स्त्रियांच्या संवेदना त्यांनी या कवितेतून अभिव्यक्त केल्या आहेत. या कवितेतून त्यांनी स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध घेतला आहे. जिथे स्त्रीच्या अंतर्मनाच्या संघर्षाचे चित्रण आहे. प्रभा गणोरकर यांची कविता स्वतःशी संवाद करणारी आहे. स्त्रीच्या भावनांची असाहायता, आशा, आत्मपरीक्षण, स्त्रीमनाची संवेदनशीलता असे स्त्री-जीवनानुभव आणि चौकटबंद जीवनातील स्त्री अंतर्मनाशी संवाद साधत गर्दीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करते या गर्दीतून स्त्रीच्या भावनांचा, संवेदनांचा गहन अनुभव येथ्प्रगट होताना दिसतो ज्यामुळे वाचकाला जीवनाच्या गडबडीतुन आत्मपरीक्षणाची गरज भासते जी जीवनाच्या वास्तविकतेचा विचार करायला भाग पाडते. प्रभागाणोरकर यांची ही कविता स्त्री संवेदन आणि सामाजिक स्थित्यंतरांना स्पर्श करते. स्त्री म्हणून वाट्याला आलेला सनातन संघर्ष आणि स्त्रीवादी दृष्टिकोनातून जीवनातील विविध अडचणी आणि आव्हानांचा सामना करण्याची भावना व्यक्त करते. त्यांची ही कविता एक स्वतंत्र संघर्षशील स्त्रीची प्रतिमा उभी करते जी समाजातील रुढीवादी वर्तुळाबाहेर जाऊन जीवनाचा अनुभव घेते. 'अस्तित्व शोध' हे प्रभागणोरकर यांच्या कवितेचे महत्त्वाचे आशय सूत्र आहे.

**2. अश्विनी घोंगडे** :

स्त्री पुरुष संबंधातील कोरडेपणा, पुरुषप्रधान संस्कृतीच्या आरशातील स्त्रीचे खरे प्रतिबिंब, समाजात घडणाऱ्या रूढ घटनांचा आलेख, पुरुषी समाज व्यवस्थेने विकृत केलेल्या प्रवृत्तीचे दर्शन, अशा अनेक व्यक्ती प्रवृत्तीच्या जीवनानुभवातून त्यांची कविता अभिव्यक्त होताना दिसते. अश्विनी घोंगडे या स्त्रीवादी विचारसरणीच्या कवियत्री म्हणूनच प्रसिद्ध आहेत. त्यांची विचारसरणी स्त्री -पुरुष समानता सांगणारी आहे. पुरुष स्त्रीला नानाविध प्रकारे छळत असतो कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे, सुसंस्कृत पुरुष देखील स्त्रीचा अप्रत्यक्ष छळ करत असतो पण तो असंस्कृत माणसाने केलेल्या स्त्रीच्या छळाला हसत असतो. याचे मार्मिक वर्णन करताना त्यांच्या 'अन्वय" या काव्यसंग्रहातील कवितेतून त्या म्हणतात,

Research Hub International Journal

" दुःख कमी होत नाही काळाने ते फक्त पिकून समंजस होते
आणि त्याचे थर साचत राहतात
सदैव धडपडत काळजाच्या धडावर...... " (दुःख पृ.क्र.42)

या कवितेतुन समाजातील पुरुषी समाज व्यवस्थेच्या विकृत प्रवृत्तीचे दर्शन येथे घडते. पुरुषांच्या वासनांध प्रवृत्तीवर उपहासात्मक पद्धतीने कोरडे ओढण्याचे काम कवयित्रीने येथे केले आहे. स्त्री-पुरुष संबंधातील कोरडेपणा आणि त्यांच्यातील अंतर यांच्या भावगर्भ पदरांचे प्रत्ययकारी दर्शन त्यांनी या कवितेतून अभिव्यक्त केले आहे. स्त्रीच्या जीवनातील संघर्ष, अडचणी, दुय्यम भूमिका , हुंडाबळी, स्त्रीच्या शरीराचं भांडवल करून फायदा मिळवण्याची वृत्ती असे अनेक पैलू साकारताना त्यांच्या 'समग्र स्त्रीसूक्त ' या काव्यसंग्रहातील कवितेतून त्या म्हणतात,

"कुणी फिरवतय तिला गरगर, नजरेच्या जबर धाकावर,
टिचभर हुंड्यासाठी कुणी, अग्नी ठेवलाय तिच्या पदरावर,
तिला तोडत-मोडत गेले, स्वतःसाठी तिच्या पाशी
एक कलेवर उरले. " (बलात्कार पृ.क्र.48)

अश्विनी घोंगडे यांनी त्यांच्या कवितेतून स्त्रीच्या जीवनातील संघर्षमय सामाजिक अत्याचाराचे चित्रण केले आहे. या कवितेतुन त्यांनी मध्यमवर्गीय स्त्रीच्या अस्तित्वाचे विविध पैलू उलगडले आहेत. महानगरातील स्त्रियांच्या आत्मसन्मानाची होणारी हानी आणि समाजातील स्त्रियांची होणारी दुर्दशा या कवितेतून व्यक्त केली आहे. अश्विनी घोंगडे यांची कविता सामाजिक जीवना अनुभवातून अभिव्यक्त होताना दिसते.

**3. ज्योती लांजेवार** :

दलित साहित्यातील काव्यक्षेत्रात ज्योती लांजेवार यांचे काव्य लक्षणीय आहे. ज्योती लांजेवार यांच्या "दिशा", "अजून वादळ उठले नाही" आणि "शब्द निळे आभाळ" या काव्यसंग्रहातून येणाऱ्या स्त्री प्रतिमांमध्ये स्त्री वेदना, संवेदनशीलता, स्त्रीभावनां आणि सामाजिक जाणीव याची अभिव्यक्ती दिसून येते. स्त्री जाणीवा, स्त्रियांच्या समस्या, स्त्री दुःख, स्त्रियांवर परिणाम करणारे सामाजिक, राजकीय घटक, रूढी परंपरेने उध्वस्त झालेले स्त्री जीवन, पुरुष वर्चस्वाने स्त्रीची झालेली गळचेपी इत्यादी संदर्भ त्यांच्या कवितेतून डोकावताना दिसतात. दलित स्त्री जाणीव आणि समस्या यांचे चित्रण त्यांच्या कवितेमध्ये आढळते. हिंदू रुढीपरंपरा, स्त्रियांचे बालविवाह, सतीची सक्ती, केशवपन, पुनर्विवाह बंदी, शिक्षण बंदी अशी अनेक बंधने लाभली गेली होती ही बंधने म्हणजे स्त्रीत्वाचा माणूस म्हणून अपमान आहे असे कवियत्रीला वाटते. आजही, स्त्री ही पापाचे स्थान आहे असे पुरुष जातीला वाटते पण त्याच स्त्रीच्या पोटी आपण जन्म घेतला आहे याचा त्यांना विसर पडला आहे याचे मार्मिक वर्णन करताना त्यांच्या अजून वादळ उठले नाही' या काव्यसंग्रहातील कवितेतून त्या म्हणतात,

" कोणी लोटले.... कुणी लुटले,
कुणी लाटले...... कुणी लाडले,
तरी बरे......सारेच गर्भाचे नाळ तोडून,
केवळ 'पुरुष' झालेले. " (डंख पृ.क्र.32)

कवियत्रीने समाजातील पुरुषसत्ताक वर्चस्वात दलित स्त्री वा समग्र स्त्री वर्गाची होणारी कुतरओढ, अन्याय, शोषण यावर प्रकाश टाकला आहे. दलित स्त्रियांचा संघर्ष, त्यांच्या अनुभवांची गहनता आणि समाजात स्त्री ला

दिले जाणारे दुय्यम स्थान म्हणजे समाजातील असमानतेवर प्रकाश टाकला आहे. स्त्री शक्ती आणि सामाजिक अन्यायाच्या विरोधात आवाज उठविला आहे. दलित स्त्रियांच्या जीवनातील विविध पैलूंना फोडली आहे.

युगानयुगे जातीयतिने राजकारणाने समाजाच्या पिळवणुकीने स्त्रीच्या मनावर झालेले संस्कार स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुःख, यातना ,वेदना, व्यथा इत्यादींची तीव्रता जास्त आहे परंतु आतापर्यंतच्या अनुभवानी आणि प्रगत शिक्षणामुळे स्त्रीच्या विचार कक्षा रुंदावल्या आहेत त्यामुळे स्त्री पेटून उठलेली आहे. आता ती सजग झाल्यामुळे खंबीरपणे उभी राहून सर्वांचा सामना करू शकते असे कवयित्रीला वाटते. ज्योती लांजेवार या कवयित्रीने त्यांच्या कवितांमधून स्त्रियांच्या हक्कांचे, त्यांच्या शिक्षणाचे महत्त्व आणि स्वातंत्र्याच्या संघर्षाचे मुद्दे उठवले आहेत सामाजिक न्याय, स्त्री- सक्षमीकरण आणि दलित अनुभव यावर विशेषतः लक्ष केंद्रित केले आहे.

**4. मल्लिका अमरशेख** :

मल्लिका अमरशेख या 1980 च्या दशकातील स्त्रीवादी काव्यातील पहिली कवयित्री असे म्हणायला हरकत नाही.' वाळूचा प्रियकर' हा त्यांचा 1979 साली प्रकाशित झालेला पहिला काव्यसंग्रह आहे. त्यांच्या 'देह ऋतू' आणि 'महानगर' यांसारख्या कविता संग्रहांमधून त्यानी विद्रोह स्वरूप व्यक्त केले आहे. या स्त्रीवादी विचारांच्या प्रखर समर्थक आहेत. त्यांच्या कवितांमध्ये पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेतील असमानता, स्त्री-पुरुष संबंध आणि सामाजिक बदल यांचे प्रभावी चित्रण दिसून येते. त्यांच्या लेखनात तळमळ तडफड आणि वैयक्तिक अनुभवांचे प्रतिबिंब दिसून येते ज्यामुळे त्या एक बंडखोर आवाज बनल्या आहेत असे वाटते. स्त्रियांच्या जीवनावर लादलेल्या बंधनाचे आणि पुरुष सत्ताक समाजातील स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायावर शिक्कामोर्तब करताना त्यांच्या "वाळुचा प्रियकर' या काव्यसंग्रहातील कवितेतून त्या म्हणतात,

"कोण जातंय ते अभेद्य गुहेवरून ,
स्त्री स्वातंत्र्याची पिचकी तुतारी फुंकून,
रजस्वला,संभोग, बाळंतपण शरीराभोवती फिरलेले,
आयुष्यासकट माणसाचं चक्र मुक्त वेदनांचा वेटोळ " (शरीरसूक्त पृ.क्र.9 )

स्त्रीच्या वाटायला येणाऱ्या ह्या नैसर्गिक गोष्टी आहेत परंतु योनीशुचित्वाच्या परिघातच तिचं आयुष्य फिरत राहतं. स्त्रियांच्या वास्तव जीवनावर त्यांनी परखडपणे भाष्य केले आहे. प्रचलित शब्दांचा परिणामकारक आणि प्रतिकात्मक वापर करून स्त्री मनाच्या विविध अंगाला त्यांनी स्पर्श केला आहे. पुरुष संस्कृती आणि वर्चस्वाला बळी पडणाऱ्या स्त्रीचे वास्तव त्यांनी येथे मांडले आहे. स्त्री-पुरुष संबंधातील बदल आणि समाजातील लिंग भेद यावर त्यांनी प्रभाव टाकला आहे. त्यांच्या मते, समाज, स्त्री-पुरुष संबंधाबाबत पक्षपाती भूमिका घेतो आणि स्त्रियांच्या जीवनावर बंधनाची पाचर मारतो. त्यांनी शहरी जीवनातील या बदलत्या संदर्भावर प्रकाश टाकला आहे. महानगरातील भीषण दारिद्र्य एकटेपणा, भयानकता, भाव शून्यता, स्त्री-पुरुष संबंध, करुणा हिंस्रता,वेदना त्यांच्या कवितेतून आक्रोश करताना दिसून येतात.

**5. नीरजा** :

नीरजाच्या जवळजवळ सर्व कविता स्त्रीवादी, स्त्रीकेंद्री आहेत. नीरजा यांच्या कवितेत स्त्रियांच्या अनुभवांची गहनता, सामाजिक भान आणि वास्तववादी दृष्टीकोन यांचा समावेश दिसून येतो. नीरजाने आपल्या कवितेतून स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार पुरुषाची भोगवादी वृत्ती यामुळे उद्ध्वस्त होणारे स्त्री जीवन याचा वेध घेतला आहे. सर्जनशील आत्मभानाची विस्तृत केंद्र त्यांच्या कवितेतून जाणवतात. निरन्वय, वेणा आणि स्त्री गणेशा

या तीन काव्यसंग्रहातून त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नावर भाष्य केले आहे. नीरजाची कविता स्त्री जीवन, स्त्रीमन, स्त्रीची होणारी मानसिक फरपट, स्त्री-पुरुष संबंध,मी -तू संबंध व्यक्त करणारी कविता आहे. स्त्री-पुरुष नात्यांचे संवेदन व्यक्त करताना त्यांच्या "वेणा' या काव्यसंग्रहातील कवितेतून त्या म्हणतात,

"शेवटी उघड्या वक्षावरून फिरणारा दहा रुपयांचा हार,
आणि काळया मण्यात गुंतलेली हक्काची वासना यात मी कोठे"
( सावित्री पृ.क्र.१३ )

बंधनमुक्त झालेल्या स्त्रीची अवस्था ही त्रिशंकुसारखीच आहे. स्त्रीच्या आयुष्यात आलेल्या दुःखाचे भिंग फोडणारी आहे. रोखठोक विद्रोही स्त्रीमनाचा आणि स्त्री संवेदनाचा धगधगता अविष्कार येथे व्यक्त केला आहे. 'स्त्री' या घटकाची सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये कशी नाकारली जातात आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांची कशी परवड होते अशा स्त्रियांच्या मुक वेदनांचे गांभीर्य त्यांनी व्यक्त केले आहे. समाजात स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, पुरुषांची भोगवादी वृत्ती यामुळे उध्वस्त होणारे स्त्री जीवन याचा वेध घेतला आहे तसेच महिलांच्या अनुभवांची गहनता आणि सामाजिक अन्यायावर टीका केली आहे. नीरजा यांनी सामाजिक दबाव, स्त्रीच्या मानसिकतेतील बदल आणि आत्मनिर्भरतेच्या आकांक्षा यांचे प्रभावी चित्रण केले आहे. स्त्री अस्तित्वाचे महत्त्व सांगताना त्यांच्या 'स्त्रीगणेशा ' या काव्यसंग्रहातील कवितेतून त्या म्हणतात,

"बाई वाळत राहते कडकडीत त्यांन पांघरलेल्या उन्हात,
शरीरभर पडलेल्या भेगा, लिंपताना त्याच्यासाठी,
मनावरही खपली धरावी म्हणून प्रयत्नशील असते बाई.. " (बाई पृ.क्र.५६)

नीरजा यांच्या 'बाई' या कवितेतील प्रमुख विषयच स्त्रीच्या अस्तित्वाची आणि तिच्या संघर्षाची गुढता आहे. या कवितेत त्यांनी स्त्री पुरुष संबंधातील ताण आणि हक्काची वासना ह्या सगळयात स्त्रीचे स्थान काय या प्रश्नावर भाष्य केले आहे स्त्री-पुरुष संबंधातील मुखवट्यांचे नाते या कवितेतून अविष्कृत होताना दिसते. स्त्रीच्या शारीरिक, मानसिक, आत्मिक आणि भावनिक आयामांचा आढावा त्यांनी या कवितेतून घेतलेला आहे जिथे ती स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि शक्तीचे प्रतीक म्हणून उभी आहे. आपली समाजव्यवस्था आणि त्यामध्ये जगणारी व जगवणारी ही स्त्री स्वतः कोण- कोणत्या ताण-तणावांमध्ये आहे हे तिचे सर्व ताण नीरजा यांनी या कवितेतून व्यक्त केले आहे. ही कविता स्त्रीच्या विविध भूमिकांचे आणि तिच्या जीवनातील आव्हानांचे चित्रण करते ज्यामुळे स्त्रीचा आवाज आणि अस्तित्व महत्त्वाचे ठरते. स्त्री हीच केंद्र मानून तिचे सर्व पदर, अंतकरणाच्या विविध छटा कवयित्री व्यक्त करते म्हणून ही कविता समकालीन स्त्रीवादी विचारधारांचा एक महत्त्वाचा भाग बनते.

**6. प्रज्ञा लोखंडे** :

प्रज्ञा लोखंडे या 1980 च्या दशकातील आधुनिक मराठी लेखिका, 'दलित कवियत्री' किंवा 'महानगरीय कवयित्री' किंवा 'स्त्री केंद्रीय कवयित्री' म्हणून त्यांचे स्थान आघाडीवर आहे. त्यांच्या 'अंतस्थ'(1993) आणि 'अस्वस्थ जीवघेण्या धगीवर' (2002) या काव्यसंग्रहातील कवितांमधून त्यांनी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठविला आहे. त्यांनी आपल्या काव्यातुन स्त्री मनाचा, संवेदनांचा अत्यंत सखोलपणे चिंतनशील विचार मांडला आहे प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेचा रूपबंध स्त्री वेदनेशी निगडित असल्याने त्यांनी, त्यांच्या कवितेतून स्त्री संवेदनाचा सखोल विचार मांडला आहे. दलित स्त्रियांवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडली

Research Hub International Journal

आहे. पुरुष सत्तेच्या साम्राज्याला भेदणारा भावअविष्कार त्यांच्या कवितेत दिसून येतो. घुसमटणाऱ्या दलित स्त्रीच्या आभाळाभर दुःखाला वाचा फोडताना त्यांच्या 'अंतस्थ' या काव्यसंग्रहातील कवितेतून त्या म्हणतात,

"तू घुसमटत राहिलीस जळत्या लाटांच्या थैमानात,
अलवार चांदण्याच्या पडझडीचा सुगावा लागला तेव्हा,
खूप उशीर झाला असेल रूपकुंवर ... " किंवा "
"जोहरापासून सतीपर्यंतचा हा प्रवास,
एक्कीसवी सदीत तसूभरही बदलला नाही रूपकुंवर ...." (रूपकुंवर
पृ.क्र.16)

प्रज्ञा लोखंडे यांनी दलित स्त्रीच्या जीवनातील वेदना, संघर्ष आणि मुक्तीचा प्रवास 'रूपकुंवर' या पत्राच्या माध्यमातून मांडला आहे. रूपकुंवर ही एक दलित स्त्री असून तिच्या जीवनातील शोषण, अन्याय आणि अस्मितेच्या लढ्याचे वर्णन त्यांनी या कवितेतून केले आहे. तिच्या आत्मसन्मानासाठीच्या लढ्याला महत्त्व दिले आहे. प्रज्ञा लोखंडे यांनी या कवितेतून स्त्री -पुरुष संबंध, सामाजिक अन्याय आणि अस्मिता यांचे गहन विश्लेषण केले आहे. दलित स्त्रीच्या संघर्षाची पीडा त्यांनी आपल्या या कवितेतून मांडली आहे. दलित स्त्रियांचे जगणे म्हणजे रोजचेच मरणे आहे आणि दलित स्त्रीच्या जगण्यातील घुसमट त्यांच्या कवितेतून व्यक्त होताना दिसते. स्पष्टवक्तेपणा परखडपणा आणि वास्तववादी लिखाण यामुळे त्यांची कविता अधिक प्रभावी झालेली दिसते.

**सारांश :**

1980 च्या दशकात महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि वैज्ञानिक क्षेत्रातही झपाट्याने बदल झाले. या बदलाबरोबरच कौटुंबिक आणि आर्थिक परिस्थिती बदलत गेली. स्त्री शिकून अर्थार्जनासाठी घराबाहेर जाऊ लागली. ऐहिक सुखात वाढ झाली. या सगळ्याचा परिणाम जीवनमान आणि राहणीमान यावर झाला. स्त्रिया विविध क्षेत्रात मान्यवर पदावर आरुढ झाल्या. या बदलांचे परिणाम मराठी कवितेवर होत गेले. या काळात स्त्रीला आपल्या स्वतःच्या अस्मितेची जाणीव होऊन स्त्री सजग झाली हा बदल स्त्रीवादी काव्याच्या रूपाने प्रगट झाला.

1980 च्या दशकातील स्त्रीकेंद्री कविता कधी स्त्रीवादी, कधी वास्तववादी, कधी भावनाप्रधान, कधी भावगर्भ, कधी परंपरावादी, कधी बंडखोर, कधी विद्रोह करणारी, कधी पूर्णपणे स्त्रीकेंद्री अशी विविध प्रकारचा स्त्रीवादी कवितेचा प्रवाह समृद्ध होत गेला. बदलत्या काळानुसार आणि बदलत गेलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रभावामुळे निर्माण झालेल्या जडणघडणीत प्रभा गणोरकर, अश्विनी घोंगडे, ज्योती लांजेवार, मल्लिका अमर शेख, नीरजा, प्रज्ञा लोखंडे या कवियत्रीने स्त्रीवादी दृष्टीने दमदार काव्य लेखन केले. काव्याभिव्यक्तीच्या नव-नवीन वाटा त्यांनी विकसित केल्या.

1980 च्या दशकातील स्त्रीकेंद्रीय कवितेच्या प्रवाहात अनेकविध आणि वैविध्यपूर्ण अनुभूतींचे प्रतिबिंब दिसून येते जे की 1980 नंतरच्या नवीन पिढीतील कवी कवयित्रीना प्रेरक, मार्गदर्शक, अभ्यासनीय, वाचनीय आणि चिंतनीय ठरले आहे. या दशकातील कवियत्रीने स्त्रीमुक्तीचा किंवा स्त्रीपुरुष समानतेचा दृष्टिकोन आशावादी ठेवणारे काव्य लेखन केले. स्त्रियांच्या मुक्तीसाठी स्त्री काव्यरचनेमधून स्त्री समस्यांना वाचा फोडली. पारंपारिक जीवन मूल्यांची चौकट भेदून स्त्रियांच्या स्वत्वाचा शोध घेतला. घरातील आणि घराबाहेरील स्त्रियांचा जीवनपट त्यांनी त्यांच्या काव्यातून अभिव्यक्त केला.

1980 च्या दशकातील स्त्रीकेंद्रीय कविता समग्र सामाजिक, राजकीय,आर्थिक व भौतिक आशयाला कवेत घेणारी आहे. एकंदरीत 1980 च्या दशकातील कवियत्रीने स्त्री परिवर्तनाची आणि स्त्री जीवनाविषयी बांधिलकीची जाणीव त्यांच्या काव्यलेखनातून जपली आहे.

**निष्कर्ष:**

1. स्त्रीवादी साहित्याच्या प्रवाहात स्त्री- पुरुष समानता हा लढा वर्षांनुवर्षे सुरूच राहणार आहे. 1980 च्या दशकात स्त्रीकेंद्री प्रवाहाला गती मिळाली,अनेक कवयित्रींनी स्त्रीवादी कविता लिहिल्यामुळे स्त्रीकेंद्री प्रवाह व्यापक बनला. फार प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला दिला जाणारा गौण, दुय्यम दर्जा किंवा 'स्त्री' एक वस्तू वा धन म्हणून पाहण्याच्या समाजाच्या वृत्ती विरुद्ध 1980 च्या दशकातील स्त्रीकेंद्री कवितेने आवाज उठवला त्यामुळे स्त्री आत्मनिर्भर बनली.
2. 1980 च्या दशकातील स्त्रीकेंद्री कवितांनी महिलांचे शोषण, पारंपारिक रूढी परंपरा, स्त्री दुःख, वेदना,अन्याय- अत्याचार, गुलामी, निराशा, व्याकुळता, अविश्वास, स्त्री-पुरुष संबंध, वर्ग, वर्ण, धर्म,लिंग, महिलांच्या जीवनातील विविधता, संघर्ष,महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, आर्थिक विषमता इत्यादी अनेकविध विषयांवर भाष्य केले त्यामुळे महिलांच्या सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाला चालना मिळाली.
3. या कवयित्रींनी स्त्रीचा आत्मसन्मान, स्वतंत्रता आणि तिच्या स्वप्नांच्या अन्वेषणावर जोर दिला त्यांनी पारंपारिक भूमिकांना आव्हान दिले आणि स्त्रीच्या आवाजाला महत्व दिले ज्यामुळे स्त्रीच्या सशक्तिकरणाची आवश्यकता स्पष्ट झाली. स्त्रीला तिच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली आणि तिला तिच्या हक्कांसाठी लढण्यास प्रेरित केले.
4. या कवयित्रींच्या काव्यातून आत्मसन्मान, स्वातंत्र्य सामाजिक न्याय, आर्थिक स्वावलंबन आणि संघर्ष या तत्त्वांची स्त्रियांना जाणीव झाल्यामुळे स्त्री सजग होऊन आत्मनिर्भर बनली आणि सामाजिक चळवळींना प्रोत्साहन मिळाले उदा.महिला हक्क अधिकार चळवळ इ.
5. 1980 च्या दशकातील या कवयित्रींच्या काव्य लेखनाने स्त्रियांना त्यांच्या हक्कांची जाणीव झाली आणि स्त्रियांमध्ये आत्मजागृती वाढली, स्त्रियांच्या लेखनात धारदारता आणि प्रखरता आली, स्त्रियानीं पुरुष वर्चस्वाविरुद्ध आवाज उठवून समाजात पुरुषांच्या बरोबरीने समान स्थान मिळवले, स्त्री पारंपारिक भूमिकेतून बाहेर पडली, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढला व त्यांनी आपल्या अधिकारासाठी लढण्यास सुरुवात केली, स्त्रीला स्वत्वाची जाणीव झाली.

एकूणच, 1980 च्या दशकातील 'स्त्रीकेंद्री' कविता ही स्त्रियांच्या कवितेला आणि एकूण मराठी कवितेला विकासाकडे नेण्या इतकी महत्त्वाची ठरली.

Research Hub International Journal

**संदर्भसूची :**


- डॉ. घोंगडे अश्विनी-" स्त्रीवादी समीक्षा स्वरूप व उपाययोजना" दिलीपराज प्रकाशन- पुणे, प्र.आ. 1993 पृ. क्र.94
- गणोरकर प्रभा - विवर्त(1985), पॉप्युलर प्रकाशन, पुणे प्र.आ.-1994, पृ.क्र. 65
- घोंगडे अश्विनी - "अन्वय' (1992), दिलीपराज प्रकाशन, पुणे- 1992, पृ. क्र.42
- लांजेवार ज्योती - 'अजून वादळ उठले नाही' क्रांतीपर्व प्रकाशन-प्र.आ.-2000 पुणे. पृ. क्र.32
- अमर शेख मल्लिका - "वाळुचा प्रियकर"(1979) ज्योती अमर शेख प्रकाशन , प्र.आ.-1979 .पृ.क्र.9
- नीरजा - 'वेणा'(1992) निळकंठ प्रकाशन पुणे प्र.आ.-1994 पृ. क्र.32
- नीरजा - 'स्त्रीगणेशा'(2003 ) ग्रंथाली प्रकाशन प्र.आ.-2005 पृ. क्र.56
- लोखंडे प्रज्ञा - 'अंतस्थ' (1993) डिंपल प्रकाशन ठाणे दु.आ.-2005 पृ. क्र.35
- डॉ.पावसकर रामकली -"मराठी कविता प्रवृत्ती व प्रवाह" स्वरूप प्रकाशन- औरंगाबाद, प्र.आ.-2015, पृ. क्र.185
- जाधव रा.ग.-"साठोत्तरी मराठी कविता व कवि" साकेत प्रकाशन- औरंगाबाद-प्र.आ.-1997, पृ. क्र.95


Research Hub International Journal